**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रवेश/२०२१/ 785
दिनांक : 29 JUN 2021

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
तसेच एमबीए व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत येत असलेल्या व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहीती सादर करणेबाबत.**
संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/गु.या./२०२१/३९४ दिनांक १८/२/२०२१.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या संस्थेकडून तपासणी करुन तपासणी अधिका-यांचे सही शिक्यानिशी या कार्यालयास सादर केलेल्या आहे.

तथापी गुणवत्ता यादीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, आपल्या संस्थेमध्ये जे विद्यार्थी अंतिम वर्षामध्ये परीक्षेला बसलेले होते परंतु प्रवेशाच्या दिनांकापर्यंत अश्या विद्यार्थ्यांचे निकाल लागलेले नाहीत अश्या विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीवर Appearing असे नमुद केले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, अश्या Appearing म्हणून गुणवत्ता यादीतील टक्केवारीच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी अभ्यासक्रमाच्या संपुर्ण वर्षांच्या मुळ गुणपत्रिका व त्याची साक्षांकीत छायांकीत प्रत या कार्यालयास खालील नमुद प्रपत्रात दर्शविण्यात आलेल्या दिनांकास जिल्हानिहाय या कार्यालयास सादर कराव्यात. दिलेल्या दिनांकास तपासणी साठी आपण उपस्थित न राहल्यास भविष्यात होणा-या नुकसानीस आपण स्वत: जबाबदार राहाल, याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(डॉ. आर.पी. मोगरे)**
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# प्रपत्र.

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पदवी अभ्यासक्रमाच्या मुळ गुणपत्रिका व साक्षांकीत छायांकीत प्रत तपासणीसाठी या कार्यालयात उपस्थित राहावयाच्या संस्थांचे जिल्हानिहाय वेळापत्रक.**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | जिल्हा | उपस्थित राहावयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २ | व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर पदवी संस्था अमरावती विभाग, अमरावती. | अमरावती | दि.१ /७/२०२१ |
| | | वाशिम | दि. १/७/२०२१ |
| | | अकोला | दि. १/७/२०२१ |
| | | बुलढाणा | दि. २/७/२०२१ |
| | | यवतमाळ | दि. २/७/२०२१ |

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.